**राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमध्ये तसेच ग्रामविकास विभागाच्या अधिपत्याखालील इतर कार्यालयांमध्ये GST TDS, Income Tax वरील TDS/TCS तसेच Labour Cess, रॉयल्टी आणि इंन्श्युरन्स इत्यादी प्रकारच्या वजावटी यांचा भरणा/ रिटर्न्स भरण्यासाठी एजन्सीची निवड करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२४२०/प्र.क्र.१९/आपले सरकार कक्ष**
बांधकाम भवन,२५,मर्झबान पथ.
फोर्ट,मुंबई-४००००१
दिनांक: ०६ सप्टेंबर, २०२१

**वाचा :** १. ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण-२४२०/प्र.क्र.१९/आपले सरकार कक्ष, दिनांक १० मार्च,२०२१

२. ग्रामविकास विभाग शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२४२०/प्र.क्र.१९/आपले सरकार कक्ष, दिनांक २९ जुलै, २०२१ चे शुद्धीपत्रक.

**प्रस्तावना:**

या विभागाच्या शासन निर्णय समक्रमांक्र, दि.१० मार्च, २०२१ अन्वये राज्यातील ग्रामपंचायती, पंचायत समित्या व जिल्हा परिषदांमध्ये तसेच या विभागाच्या अधिनस्त इतर शासकीय कार्यालयांमध्ये GST TDS, Income Tax वरील TDS/TCS तसेच Labour Cess, रॉयल्टी आणि इंन्श्युरन्स इत्यादी प्रकारच्या वजावटी यांचा भरणा/ रिटर्न्स भरणेकरिता अन्वये जयोस्तूते मॅनेजमेन्ट प्रा.लि. पुणे या संस्थेची निवड करण्यात आली आहे. तसेच शासन शुध्दीपत्रक सतक्रमांक दिनांक २९ जुलै,२०२१ अन्वये पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान, महाराष्ट्र राज्य , पुणे यांना जयोस्तूते मॅनेजमेन्ट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून काम करून घेणे ऐच्छीक करण्यात आले होते. ग्रामपंचायत स्तरावर GST TDS, Income Tax **वरील** TDS/TCS **तसेच** Labour Cess, रॉयल्टी आणि इंन्श्युरन्स इत्यादी प्रकारच्या वजावटी यांचा भरणा/ रिटर्न्स

भरणेकरिता प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव असल्याने तसेच तेथे याकामासाठी स्वतंत्र यंत्रणा नसल्याने ग्रामपंचायतींना विहित कालमर्यादेत वजावटींचा भरणा/ रिटर्न्स भरणे शक्य व्हावे व त्यांना उशीराने भरणा केल्याबद्दल दंड भरावा लागु नये ही बाब विचारात घेऊन ग्रामपंचायतींना मात्र दि.१ जुलै, २०२१ पासुन जयोस्तूते मॅनेजमेन्ट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून काम करून घेणे बंधनकारक करण्यात आले होते, आता याबाबत शासनाने आता पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

ग्रामपंचायत कार्यालयांमध्ये GST TDS, Income Tax वरील TDS/TCS तसेच Labour Cess, रॉयल्टी आणि इंन्शुरन्स इत्यादी प्रकारच्या वजावटी यांचा भरणा/ रिटर्न्स भरणेकरिता जयोस्तूते मॅनेजमेन्ट प्रा.लि. पुणे या संस्थेकडून काम करून घेणे बंधनकारक नसून ऐच्छिक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२१०९२११३१३४०४४२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e86ac5658c4f446f46a56052bf048257ffe4ea09078de9d556ae5babe8adc8b1, pseudonym=37D9D56800E3803E7F4DEAA21F9F7FAB712736F6, serialNumber=481AF6EECE7C1D432D3119135BE703BF6529E7A455A9B17708C677B565D8EE24, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2021.09.22 12:16:53 +05'30'

**(प्रविण जैन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. सभापती विधान परिषद यांचे खाजगी सचिव
५. मा. अध्यक्ष विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेते विधान परिषद/ विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन मुंबई
७. सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन मुंबई
८. शासनाचे मुख्य सचिव

९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
१०. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
११. मंत्रालयीन सर्व विभाग
१२. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
१३. सर्व जिल्हाधिकारी
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१५. सर्व उप सचिव ,ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,मुंबई,
१६. उप सचिव (वित्त-२/४), ग्राम विकास विभाग,बांधकाम भवन,मुंबई
१७. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामिण जीवनोन्नती अभियान, सीबीडी बेलापुर, नवी मुंबई
१८. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपुर
२०. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपुर
२१. निवासी लेखा परीक्षा अधिकारी.
२२. गट विकास अधिकारी,पंचायत समिती (सर्व)
२३. ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत (सर्व)
२४. सर्व कार्यासने, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
२५. जयोस्तूते मॅनेजमेन्ट प्रा.लि. पुणे.
२६. प्रकल्प व्यवस्थापक, सीएससी ई- गव्हर्नन्स सर्व्हिसेस इंडिया लि. दिल्ली.
२७. निवडनस्ती (आपले सरकार कक्ष)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास), यांचे खाजगी सचिव
३. मा.अपर मुख्य सचिव (ग्रामविकास विभाग) यांचे स्वीय सहायक